|| शरणागती ||

शरण मज आला आणि वाया गेला ।
    दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥

## शरणागतीच्या पाच अवस्था

१) मीतुझा आहे आणि तू माझा आहेस.
२) मी फक्त तुझाच आहे आणि तुझ्यासाठीच आहे, तू माझा असतोसच.
३) मी तुझ्याशिवाय जगूच शकत नाही कारण तू आहेस मणूनच मी आहे.
४) ‘तुझ्याशिवाय’ अशी अवस्थाच असू शकत नाही म्हणूनच माझे ‘मी’ पणही तूच आहेस.
५) शरणागती - मिलाप.
शरणागतीच्या मार्गावर पडणाऱ्या पावलांना दहा बोटे असावी लागतात.
१) रक्षिष्यतीति विश्वास :- एकमेव भगवंतच माझे सर्वदृष्ट्या रक्षण करू शकतो आणि करीलच हा दृढविश्वास
२) अनुकूलस्य संकल्प :- भगवंताला जे आवडते, फक्त तेच करत राहण्याचा संकल्प.
३) प्रतिकूलस्य वर्जनम् :- भगवत्-प्राप्तीला जे जे प्रतिकूल म्हणजेच भगवंताला जे जे म्हणून न आवडणारे, त्याचा त्याग करणे.
४) कार्पण्यम् :- संपूर्ण विनम्र भाव.
५) अभिगमनम् :- भगवंताच्या दर्शनात आणि भजनात रंगून जाणे.
६) विरह :- त्याच्या चरणांना चरणधुळीप्रमाणे चिकटून राहण्याचा मोह.
७) मत्सर :- त्याच्या चरणधुळीचा मत्सर वाटणे
८) विवेक :- त्याच्या चरणधुळीचे श्रेष्ठत्व पटून ज्या प्रमाणात मत्सर वाढेल, त्याच प्रमाणात चरणधुळीविषयी प्रेमही वाढत जाणे.
९) समर्पणम् :- समर्पण म्हणजे कुठल्याही अटीशिवाय भगवंतावर प्रेम व त्याचे आज्ञापालन.
१०) अभ्यास :- संताचे अभंग, कार्य व वर्तणुक यांचे निरिक्षण व आत्मसाथ करणे.